रे. दि. मु. क्रमांक ३४/२०१५ मधील नि.क्र. ५६, नि. क्र. ५८ व नि. क्र. ५९ खालील आदेश.
दत्तात्रय कृष्णा बोडरे वगैरे विरुध्द लालजी विश्राम पटेल वगैरे
आदेश पारित दिनांक ०६.०४.२०२४

---

प्रस्तूतचे वादी नं. ८ ते ११ यांचा अर्ज निशाणी क्र. ५६ हा मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यात झालेला उशीर माफ करण्यातकरिता, निशाणी क्र. ५८ हा मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यात झालेला उशीर माफ करण्याकरिता व निशाणी क्र. ५९ हा मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेवुन त्याप्रमाणे सरनाम्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादीने अर्ज निशाणी क्र. ५६ मध्ये कथन केले आहे की, सदरच्या दाव्यातील वादी नं. १ हे दिनांक १०/०९/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. परंतु वादी नं. १ यांच्या मयत झाल्याबद्दलची माहिती वादी यांना उशीरा मिळाली. तसेच वादी नं. १ यांचे मृत्युचे ठिकाण वादी नं. ८ ते ११ यांना माहित नसलेने व सदर वादी नं. १ यांच्या मृत्यूबाबतची कागदपत्रे सदर त्यांचे नातेवाईक वादी नं. २ ते ७ व वादी नं. १ यांचे वारस यांचेकडेच असलेमुळे ती वादी नं. ८ ते ११ यांना अद्यापपर्यंत मिळालेली नाही. तसेच सदर वादी यांचे जवळचे नातेवाईकांचे २ महिन्यांपुर्वी अपघात निधन झाले होते. त्यामुळे मदतीत सदरचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता अर्ज दाखल करणे शक्य झाले नाही. तसेच वरील कारणांमुळे सदरील अर्ज दाखल करणेस जवळजवळ १३ महिने ०७ दिवसांचा उशीर झालेला आहे. अशा परिस्थितीत वारस रेकॉर्डवर झालेला उशीर माफ करण्यात येवुन वादी नं. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावेत. मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यात झालेला उशीर माफ न झाल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यात झालेला उशीर माफ करण्यात यावा, ही विनंती.

०३. वादीने अर्ज निशाणी क्र. ५८ मध्ये कथन केले आहे की, सदरच्या दाव्यातील वादी नं. १ हे दिनांक १०/०९/२०२२ रोजी मयत झालेले आहेत परंतु माहिती उशीरा मिळाल्याने व त्यांच्या मृत्यूची कागदपत्रे सदर त्यांचे नातेवाईक वादी नं. २ ते ७ व वादी नं. १ यांचे वारस यांचेकडेच असलेमुळे ती वादी नं. ८ ते ११ यांना मिळालेली नाही. त्यामुळे वादीस ९० दिवसाच्या मुदतीत सदरचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता अर्ज दाखल करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे अबेटमेंट सेट असाईड ९० दिवसांच्या आत अर्ज करणे आवश्यक होते. परंतु वरील कारणांमुळे सदरील अर्ज दाखल करणेस जवळजवळ १३ महिने ७ दिवसांचा उशीर झालेला आहे. मयत वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर आण्ण्यात झालेला उशीर माफ न केल्यास व अबेटमेंट सेट असाईड न केल्यास वादी यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे, अशा परिस्थितीत वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला उशीर माफ करण्यात यावा व वादी नं.

८ ते ११ याबाबत अबेटमेंट सेट असाईड करण्यात येवून वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यात यावे ही विनंती.

०४. वादी यांचे प्रस्तूत निशाणी क्र. ५९ च्या अर्जात कथन केले आहे की, सदर दावा हा जाहीर ठराव व निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील वादी नं. १ ते ७ व प्रतिवादी नं. १ यांचे तडजोड झाली आहे. त्यामुळे त्यांना सदरचा दावा चालविणेतचा नाही. परंतु वादी नं. ८ ते ११ यांच्यात व वादी नं. १ ते ७ व प्रतिवादी नं. १ यांच्यात सदर दाव्याचेकामी तडजोडीची बोलनी चालू होती परंतु सदरची तडजोड झाली नाही. सदरचा दावा वादी नं. ८ ते ११ यांना त्यांच्या मिळकतीतील त्यांच्या हिश्श्याकरिता वरील मागणीकरीता चालविणेचा आहे. दरम्यानचे काळात सदर दाव्यातील वादी नं. १ हे दिनांक १०/०९/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. सदर मयताच्या मृत्यूचा दाखल व कागदपत्रे अद्याप वादी यांना मिळालेला नाही. परंतु सबब वादी नं. १ हे वादी नं. ८ ते ११ यांचे नातेवाईक असलेमुळे त्यांच्या मृत्यूची माहिती वादी नं. ८ यांना मिळालेली आहे. मयत वादी नं. १ यांच्या मृत्यूनंतरही सदर वादी नं. ८ ते ११ यांना सदर दावा मे. कोर्टात चालविणेस त्यांच्या मागणीकरिता चालविणेचे कारण शिल्लक आहे. त्यामुळे सदर दाव्याच्याकामी वादी नं. १ यांचे वारस रेकॉर्डवर आणणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर वादी नं. १ यांना १. सुरेखा दत्तात्रय बोडरे(पत्नी), वय - ५० वर्षे, धंदा - घरकाम, २. प्रगती दत्तात्रय बोडरे (मुलगी) वय - २५ वर्षे, धंदा - घरकाम, ३. तेजस्वीनी दत्तात्रय बोडरे, वय - २१ वर्षे, धंदा - घरकाम येणेप्रमाणे वारस आहेत. सदरचा अर्ज हा मृत्यूबाबतची व वारसांबाबतची माहिती सदर वादी यांना मिळाली नाही. त्यामुळे सदरच्या अर्जास १३ महिने व ७ दिवसांचा उशीर झालेला आहे. सबब, सदरील अर्ज मंजूर करुन वर नमूद केलेले वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी देण्यात यावी.

०५. वादीचे निशाणी क्र. ५६ चे अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे निशाणी क्र. ६१ वर दाखल केले आहे. प्रतिवादीनुसार, वादीचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. त्यातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. वादीने अर्जासोबत वादी नं. १ चे मृत्यूचा उतारा दाखल केलेला नाही. सबब, वादी नं. १ मयत झालेले आहे कि नाही व झाला असलेस किती तारखेला झाला याबाबत मे. कोर्टासमोर कोणताही पुरावा नाही. उशीर झालेबाबत कोणतेही कायदेशीर कारण वादीने अर्जात नमूद केलेले नाही. सबब वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

०६. वादीचे निशाणी क्र. ५८ चे अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीनुसार, वादीचा प्रस्तुत अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादी मयत असलेबाबत कोणताही पुरावा पटलावर नाही, सबब प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा. वादीचे निशाणी क्र. ५९

चे अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीनुसार, वादीचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादीचा अर्ज आहे त्या स्वरुपात कायद्यानेच चालणार नाही. वादीचे वारस दाव्याचे सरनाम्यात कोणत्या स्वरुपात घेण्यात यावेत याबाबत अर्जात कोणताही तपशील नमुद नाही. सबब, मे. कोर्टास प्रस्तुत अर्ज कायद्यानेच मंजूर करता येणार नाही. प्रस्तुत वादी वारसांना दाव्यात वादी म्हणून समाविष्ट करावे अथवा प्रतिवादी म्हणून समाविष्ट करावे याच्या स्वतंत्र वेगवेगळया प्रक्रिया आहेत याचा या अर्जात कोठेही खुलासा नाही. उपरोक्त कथनांचा व कायदेशीर तरतुदींचा विचार होऊन प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात यावा.

०७. सदर निशाणी क्र. ५६, निशाणी क्र. ५८ व निशाणी क्र. ५९ चे अर्जांचे व त्यावर प्रतिवादीने दाखल केलेल्या म्हणणे याचे अवलोकन केले. सदरचे प्रकरण हे अचल संपत्ती संदर्भातील आहे अशा प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकणे अत्यंत गरजेचे आहे. प्रतिवादींनी वादी क्र. १ याच्या मृत्यूच्या तारखेबाबत स्पष्टता पटलावर नाही याबाबत आक्षेप घेतला आहे परंतु मृत्यूची बाब ही दोन्ही पक्षास मान्य असल्यामुळे वादी क्र. १ यांचा मृत्यू ही बाब सदर अर्ज ठरवत असताना लक्षात घेणे गरजेचे आहे. जर मयताचे वारस दाव्यात समाविष्ट करून घेतले तर सदरचा दावा हा गुणवत्तेवर ठरविता येईल. वादीच्या कथनानुसार त्यांनी वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज व वारसांना दाव्यात समाविष्ट करणे राहून गेले आहे. परंतु मयताचे कायदेशीर वारस दाव्यात समाविष्ट झाल्यास दोन्ही पक्षांना मदतच होणार आहे. तीनही अर्ज हे वारसांसंबंधातले आहेत. त्यामुळे सर्व अर्जावरील आदेश एकत्रीत पारित करण्यात येतो. करिता खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ५६, निशाणी क्र. ५८ चे अर्ज हे प्रत्येकी २००/- रुपये कॉस्टवर मंजूर करणेत येतो. |
| २. | सदरची कॉस्ट ही वादींनी प्रतिवादींना देण्यात यावी. |
| ३. | निशाणी क्र. ५६, निशाणी क्र. ५८ वरील कॉस्ट भरल्यानंतर वादीचा निशाणी क्र. ५९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| ४. | निशाणी क्र. ५६ व निशाणी क्र. ५८ वरील कॉस्ट भरल्यानंतर वादीचा वादी क्र. १ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे झालेला दावा संपुष्टाचा (abatement) हुकूम रद्द करणेत येतो. |
| ५. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ६. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

रे. दि. मु. नं. ३४/२०१५

PATTEBAHADUR
KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.04.12 17:27:21 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांक - ०६.०४.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा

लघुलेखकाचे नाव – सौ. सुवर्णा संकेत शिंदे

Sd/-

(एस. एस. शिंदे)

लघुलेखक